# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५

## (सकाळी १०.१५ ते ११.४५ वाजता )

**सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री

**२)** उपमुख्यमंत्री (नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम))

**३)** उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क)

**४)** महसूल मंत्री

**५)** अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

**६)** जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री

**७)** वैद्यकीय शिक्षण मंत्री

**८)** उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री

**९)** जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

**१०)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

**११)** शालेय शिक्षण मंत्री

**१२)** मृद व जलसंधारण मंत्री

**१३)** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

**१४)** उद्योग, मराठी भाषा मंत्री

**१५)** पणन, राजशिष्टाचार मंत्री

**१६)** पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

**१७)** इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री

**१८)** आदिवासी विकास मंत्री

**१९)** पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री

**२०)** माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री

**२१)** कृषी मंत्री

**२२)** महिला व बालविकास मंत्री

**२३)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**२४)** क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री

**२५)** ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**२६)** अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

**२७)** वस्त्रोद्योग मंत्री

**२८)** सामाजिक न्याय मंत्री

**२९)** परिवहन मंत्री

**३०)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**३१)** मदत व पुनर्वसन मंत्री

**३२)** मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

**३३)** कामगार मंत्री

**३४)** सहकार मंत्री

**३५)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : (क) "श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) "महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(घ) "महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर,२०२४ या कालावधीतील एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण)** : "महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) पणन मंत्री** : (क) "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा सदुसष्टावा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "राज्यातील शेतकऱ्यांना मदत करण्याची शासनाने घेतलेली भूमिका" या विषयावर श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स. यांनी दिलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी चर्चेच्यावेळी तत्कालीन कृषी मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(४) पर्यटन मंत्री** : "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे चव्वेचाळीस, पंचेचाळीस व सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

पाच : **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये एकूण २६५० शिक्षक कार्यरत असून, त्यापैकी केवळ ६५० महिला शिक्षिका असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले असणे, महिलांच्या आरक्षण धोरण व गुणवत्तेनुसार महिला शिक्षिका कार्यरत असणे, ऑनलाईन बदली प्रक्रिया, महिलांना मिळणारा संवर्गाचा लाभ यामुळे काही शाळांत उपलब्धता होत नसणे, त्यामुळे काही शाळा महिला शिक्षकांविनाच सुरू असल्यामुळे मुलींची मोठी गैरसोय होत असणे, महिला शिक्षकांचे प्रमाण २४.५ टक्के इतकेच असणे, हे प्रमाण अल्प असून १०० शाळांपैकी १२ शाळांमध्ये कोणतीही महिला शिक्षक नाही असे शाळा तपासणीत आढळून येणे, जिल्हा परिषदेच्या व शासकीय शाळांमध्ये मुलींना सुरक्षित आणि आदरयुक्त शिक्षण मिळावे, यासाठी महिला शिक्षकांची उपस्थिती अत्यावश्यक असते, मात्र प्रत्यक्ष परिस्थिती भयावह असणे, बदली धोरण व पदस्थापना देताना सुधारित निकष व शाळानिहाय आवश्यक विशिष्ट टक्केवारीनुसार प्रक्रिया राबवून धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, मुलींना त्यांच्या व्यक्तिगत समस्या किंवा आरोग्यविषयक अडचणी व्यक्त करण्यासाठी कोणत्याही विश्वासार्ह व्यक्तीचा / समुपदेशकाचा आधार नसणे, तसेच मुलींना सुरक्षित वातावरणासाठी शाळेमध्ये महिला शिक्षकांची आवश्यकता, मुलींना सुरक्षित शिक्षण व योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी महिला शिक्षकांची संख्या वाढविणे अनिवार्य असून शासनाने याप्रकरणी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता, त्यामुळे शासनाने जिल्हा परिषद शाळांवर महिला शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शासनाचे सर्व कार्यालयीन कामकाज आणि मानवी क्षमतेच्या कार्यशक्तीची क्रियाशीलता यांचे मूल्यमापन करण्याची आजवर कोणतीही व्यापक व संस्थात्मक व्यवस्था नसणे, शासनाची व्यवस्था ही जनहितासाठी बांधलेली असताना जनतेचा अनुभव काय, सेवा देण्यात विलंब का होतो, कोणता विभाग ठरवलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचला, नागरिकांचे समाधान किती याची माहिती शासनाकडे एकत्रित स्वरूपात उपलब्ध नसणे, याउलट खाजगी क्षेत्रात कंपनीचे उद्दिष्ट ठरवले जाते, key performance

indicators / performance indicators बनवले जातात, वेळोवेळी मूल्यांकन होते, चुका दूर केल्या जातात आणि संस्थेची / कंपनीची कामगिरी सुधारण्यासाठी ठोस उपाय केले जातात मात्र शासनात अशी व्यवस्था नसणे, अनेक योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च होतात, परंतु त्या योजनांचा अपेक्षित परिणाम झाला का हे तपासण्याची अधिकृत व पारदर्शक प्रणाली अस्तित्वात नसणे, प्रकल्पांचे नियमित outcome tracking/ performance audit ची यंत्रणा नसणे, सुधारणा प्रक्रिया ( corrective mechanism) अस्तित्वात नसणे, यामुळे तटस्थ खाजगी नामांकित संस्था / कंपनीकडून शासनाचे सर्व विभाग, प्रकल्प, योजना यांचे स्वतंत्र मूल्यमापन करण्याची आवश्यकता असणे, citizen feedback अनिवार्य करून " Maharashtra citizen experience index" तयार करणे, दरवर्षी department performance तयार करणे, अपयशी प्रकल्पांची कारणमीमांसा (root cause analysis) करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मौजे कोंडीविटा, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र.१६७ (पै) या मिळकतीवरील अस्तित्वात असलेल्या ६४ झोपड्यांना दिनांक ६ मे, २०२५ रोजी निष्कासनाच्या देण्यात आलेल्या नोटीसा, सदर मिळकत जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित येत असून विकास आराखडयानुसार रस्ता रुंदीकरणाकरिता झोपड्या निष्कासित करण्यात येणे, संबंधित विभागाकडून निष्कासनाची नोटीस दिल्यानंतर झोपडीधारकांनी आपले म्हणणे मांडण्याकरिता दिनांक ८ मे, २०२५ रोजी निवेदन सादर करणे, सदर निवेदनाला केराची टोपली दाखवून सब इंजिनिअर,सहायक अभियंता व वॉर्ड ऑफीस यांनी दोन दिवसांत दिनांक १५ मे, २०२५ रोजी सदरहू झोपड्या निष्कासित करणे, परिणामी झोपडीधारकांमध्ये प्रचंड असंतोष पसरणे, नियमानुसार कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता झोपडीधारकांना अंधारात ठेवून संबंधित विभागाने झोपड्या निष्कासित करणे, रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या झोपडीधारकांना तुम्ही अपात्र झाल्याची भिती दाखवून तुम्हाला पात्र करुन देतो असे सांगून दलाल व संबंधित विभागाचे कर्मचारी संगनमत करुन झोपडीधारकांची फसवणूक करुन करीत असलेली पैशांची मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, महापालिकेच्या व संबंधित विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून सुरु असलेल्या मनमानी कारभाराबाबत सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"म्हाडा पुनर्रचित ३८८ इमारतींच्या पुनर्विकासासाठी लागू असलेल्या DCPR २०३४ मधील सुधारित खंड ३३ (२४) च्या अनुसार पुनर्विकास करताना अनेक तांत्रिक व भौगोलिक अडचणी येत असणे, रहिवाशांना घरे, म्हाडाला अतिरिक्त घरे आणि विक्रीसाठी घरे यांचे गणित व्यवहार्य होत नसणे, या म्हाडा इमारती समूह पुनर्विकासाअंतर्गत होऊ शकतात व यास म्हाडा उपाध्यक्ष यांनी तोंडी सकारात्मकता दाखवली असणे, तथापि, क्लस्टरमध्ये समाविष्ट करावयाच्या सोसायट्यांनी एकत्रितपणे विकासकाची निवड करावी किंवा म्हाडाने विकास करावा, अशाप्रकारच्या ठरावाची अट टाकली असणे, इमारतीतील रहिवाशांमध्ये एकमत होण्याची शक्यता नसल्यामुळे म्हाडाने ही अट काढून टाकून इमारतींचा पुनर्विकासाचे अधिकार आपल्याकडे घेऊन स्वत: पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, मुंबईतील १३८०० उपकर प्राप्त व जुन्या चाळी/इमारतींच्या पुनर्विकासातील अडचणी दूर करण्यासाठी मुंबईतील दक्षिण आणि दक्षिण मध्य मुंबईतील १३८०० जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीमधील मुंबईकरांच्या घरांच्या पुनर्विकासाचा प्रश्न अतिशय गंभीर बनला असणे, या रहिवाशांना आजुबाजुच्या परिसरात सुरु असलेल्या पुनर्विकासात सामावून घेण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(५) **श्री.किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी भारतातील सर्व शिक्षक जे एक ते आठ स्तरावर अध्यापन करतात त्यांना शिक्षक पात्रता (टी.इ.टी.) परीक्षा अनिवार्य केलेली असणे, पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय लागू केल्यामुळे सध्या ज्यांच्या सेवा २० ते २५ वर्ष झालेल्या आहेत त्यांच्यासमोर मोठे संकट उभे असणे, शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवा समाप्तीचा अन्यायकारक निकष असणे, वर्तमान परिस्थितीत व भविष्यात सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा लागू करण्याची गरज असणे, आरटीई कायदा कलम २३ व एनसिटीई कायद्याच्या कलम १२ A मध्ये आवश्यक तो बदल करण्याची गरज निर्माण होणे, त्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला विनंती करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्याचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र शासनाने गतवर्षी अर्थसंकल्पात टीयर २ व टीयर ३ शहरांमध्ये ग्लोबल कैपेबिलिटी सेंटरना चालना देण्याची घोषणा केली असणे, या कारणास्तव कोल्हापूर हे ऐतिहासिक व आर्थिकदृष्ट्या महत्वाचे शहर असून ते आयटी उद्योग व ग्लोबल कंपन्यांसाठी आदर्श ठिकाण ठरु शकणे, वरील शहरांमध्ये कोल्हापूर शहराचा समावेश करुन येथे ग्लोबल कैपेबिलीटी सेंटर स्थापन करणे व कोल्हापूर, सांगली, सातारा या भागाला ग्लोबल इकॉनॉमिक्स झोन म्हणून विकसित करण्याबाबत राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रीडा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विदर्भ हॉकी असोसिएशन राज्यातील सन १९६० पासूनची हॉकी संघटना अस्तित्वात असून संघटनेचे कार्यक्षेत्र विदर्भासह मराठवाडा खानदेशातील २२ जिल्हे असल्याने संघटनेशी जोडलेल्या क्रीडापटूंना लाभ होत असणे, सन २०१५ साली हॉकी महाराष्ट्र नावाची संघटना विहित घटनेद्वारा सहाय्यक संस्था निबंधक, रायगड विभाग, अलिबाग, जि.रायगड या ठिकाणी नोंदणी केली जाणे, हॉकी महाराष्ट्र संघटनेने नोंदणी वेळी सादर केलेली घटना व संघटनेच्या अधिकृत वेबसाईटला जोडलेली घटना भिन्न असून हॉकी महाराष्ट्र या संघटनेने सन २०२२ मध्ये संघटनेच्या नोंदणीकृत घटनेद्वारा निवडणुका न घेता सन २०२२ - २०२६ करिता बोगस घटनेच्या आधारे घेतलल्या निवडणुकीबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असणे, हॉकी महाराष्ट्र या संघटनेसोबत विदर्भातील एकही जिल्हा जोडला गेलेला नसणे, असे असतानाही सन २०२० साली हॉकी इंडिया संघटनेने इंडियन ऑलिंपिक असोसिएशनच्या "एक राज्य-एक संघटना" या धोरणानुसार अनेक वर्षे कार्यक्षमतेने काम करणाऱ्या विदर्भ हॉकी असोसिएशन संघटनेची मान्यता रद्द करणे, हॉकी महाराष्ट्र या हॉकी संघटनेचा कारभार अत्यंत अनियमिततेने सुरू असल्याने त्याचा फटका विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील हॉकीपटूंना बसत असणे, विदर्भ हॉकी असोसिएशनची मान्यता रद्द झाल्याने सदर संघटनेशी जोडलेल्या क्रीडापटूंना सन २०२० पासून क्रीडा कोट्याचा लाभ न मिळणे, परिणामी विदर्भातील हॉकी क्रीडा पटूंना मनस्ताप सहन करावा लागणे, हॉकी महाराष्ट्र संघटनेबाबत प्रलंबित प्रकरणी निकाल न लावण्यासाठी आयुक्त कार्यालयात दबाव असणे, तसेच क्रीडा विभागाच्या नियमांचे उल्लंघन

करून संघटनेचा कारभार करण्यात येणे, याबाबत विदर्भातील हॉकी क्रीडा प्रेमींमध्ये मध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या अन्न व औषध प्रशासन मुख्यालयातील सह.आयुक्त (अन्न) यांनी गैरमार्गाने कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, यामध्ये विशेषत: त्यांच्या अखत्यारितील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या मालकीच्या कारमध्ये करोडो रुपयांची रोख रक्कम चौकशी दरम्यान आढळून येणे, तसेच गुटखा प्रतिबंधित कारवायांमध्ये अडथळा निर्माण केल्याबाबत पोलिस अधिकारी यांनी अन्न आयुक्तांच्या सदर बाब निदर्शनास आणलेली असणे, सदर अधिकारी महाराष्ट्राच्या विविध कार्यक्षेत्रात शनिवारी-रविवारी सुट्टीच्या दिवशी प्रत्यक्ष भेट देवून खाद्य तेल, मिठाई घाऊक विक्रेते यांच्याकडून दर सहा महिन्याला करीत असलेली वसुली, माहे जुलै, २०२३ मध्ये सफट चहा नमुन्यांमध्ये घातक पेस्टीसाईड सापडले असतांना ९० लाखाचा भ्रष्टाचार करुन त्यांना क्लीनचीट देवून जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण केलेला असणे, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मंत्री, अन्न व औषध प्रशासन यांनी सखोल चौकशी करुन निलंबनाचे आदेश निर्गमित करावे अशी विनंती केलेली असणे, त्याअनुषंगाने मंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश देणे त्याचप्रमाणे सहआयुक्त (विधी) यांनी अन्न औषध प्रशासन यांना चौकशी करुन अहवाल आयुक्तांना सादर करावा असे आदेश देण्यात येणे, या सर्व गंभीर बाबी लक्षात घेता या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासनाने कोणतीही कारवाई अद्याप न केल्यामुळे व्यापारी, विक्रेते दुकानदार यांच्यासह जनतेमध्ये पसरलेले भितीचे वातावरण लक्षात घेता शासनाने संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सात : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०४ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५"

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

**(ख) पुर:स्थापनार्थ —**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५." विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(३) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(४) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(५) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या

संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(६) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५"

**(घ) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

(४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५.

(५) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०६ - महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०२५

**आठ : (क) (मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ व बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किरण सरनाईक, दादाराव केचे, संदीप जोशी, संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, अमित गोरखे, धर्मगुरू राठोड, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतक-यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव

अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतक-यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाकडून सर्वकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्विकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहिर करुन शेतक-यांना तात्काळ दिलासा देण्यात येणे, जमिन खरडून गेलेल्या शेतक-यांना ४७ हजार रुपये प्रतीहेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रती हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, गाडलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणा-या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसूल थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेला निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करुन मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे, शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृध्द झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतक-यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांना तातडीने मदत देण्याची यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा हिंस्त्र व वन्य प्रण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतक-यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपन घालण्यासाठी शेतक-यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रमीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियाला २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाडयासह उर्वरित महाराष्ट्रातील मागासभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करुन बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्हयात उभारण्यात येत असलेले

उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीन" हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रेत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतक-यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतक-यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रती कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतक-यांना विम्याद्वारे प्रती हेक्टर रुपये १७ हजार मदत देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येणे इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वकष मदत देऊन शेतक-यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशा रीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाडयासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** **श्री.सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यात माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी-ओला दुष्काळ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला असणे, शेतकऱ्यांना देण्यात आलेले मदतीसाठीचे पॅकेज "फसवे" असणे, बहुतेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तुटपुंजी मदत मिळणे, शेतीचे पंचनामे करण्यास प्रशासनाकडून विलंब होत असल्याने निधी वितरणात गोंधळ उडालेला असणे, अब्जावधींचे पीक कर्ज थकित असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी न देता व्याजाचा अधिक बोजा लादणे हा निर्णय शेतकऱ्यांना अधिक खोल कर्जामध्ये ढकलणारा असणे, मा.मुख्यमंत्री यांनी कर्जवसुली स्थगितीची घोषणा करणे, परंतु प्रत्यक्ष आदेश न देता बँका शेतकऱ्यांच्या घरांवर धाड मारत असणे, राज्य व केंद्र शासनातील मतभेदांमुळे प्रस्ताव सादरीकरणात झालेल्या विलंबाचा थेट परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणात झालेली वाढ, कापूस-सोयाबीन-धान-ऊस

बाजारभाव, खरेदी प्रक्रिया, आयात धोरणे आणि हवामानामुळे निर्माण झालेल्या संकटांवर शासनाचे सततचे मौन व निष्क्रियता ही शेतकऱ्यांविषयीची गंभीर उदासीनता आणि प्रशासकीय अपयश स्पष्टपणे अधोरेखित करणे, राज्यातील अनेक महत्वाच्या महानगरपालिका, नगरपरिषद व विकास प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता आणि निकृष्ट दर्जा सतत निदर्शनास येवूनही जबाबदार अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यास होत असलेले दुर्लक्ष, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची जुनी पेंशन, नियमित वेतन, वेतनेत्तर इतर भत्ते, पदभरती, शिक्षक भरती, संच मान्यतेचे निकष बदलविणे, समायोजन समग्र शिक्षा अभियानंतर्गत २५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समावून घेणे इत्यादी प्रश्न निकाली न निघणे, उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राध्यापक भरती न होणे, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन लागू न झाल्यामुळे त्यांच्या मध्ये असंतोष पसरणे, कामगार विभागातील गृह उपयोगी व सेफ्टी किट निविदेतील गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसणे, बंजारा समाजाचा अन्य राज्याप्रमाणे आदिवासी संवर्गात समावेश करणे, मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीचा प्रश्न, ७९ बी कायदयामुळे इमारती पुनर्वसनाचे प्रकल्प रखडणे, केंद्र शासनाच्या अंतर्गत जमीन विकास न होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अनेक कामे अपुर्णावस्थेत असूनही ठेकेदारांना देयके वितरीत करुन करण्यात आलेला गैरव्यवहार, राज्यातील परिवहन खात्यात मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार, उक्त प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(१) सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.**

"राज्यातील खाद्य पदार्थामध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी पुरेशी यंत्रणा अस्तित्वात नसल्याने मोठया प्रमाणात भेसळीचे प्रकार निदर्शनास येणे, दूध, दही, तूपासह बाटलीबंद पाणी, अंडी, पनीर, खवा याचबरोबर औषधे तसेच पिकांवर फवारणी केली जाणारी किटकनाशके यामध्ये मोठया प्रमाणात भेसळ होत असल्याची बाब निदर्शनास येणे, जनतेचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या भेसळ करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असणे, खाद्य पदार्थांतील भेसळीची तपासणी करण्याकरीता आवश्यक किट, पुरेशी अत्याधुनिक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, प्रयोगशाळा इत्यादी बाबींचा अभाव असणे, भेसळ करणारे हे त्यांचा नफा वाढविण्याच्या उद्देशाने भेसळ करीत असून त्याचा जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, राज्यात भेसळ

परिक्षणाच्या केवळ दोनच प्रयोगशाळा अस्तित्वात असल्याने भेसळयुक्त पदार्थांच्या चाचण्यांसाठी विलंब होत असणे, सदर अन्न पदार्थांतील भेसळीच्या माध्यमातून कोट्यवधी रकमेचा गैरव्यवहार होणे, अन्न पदार्थातील भेसळीचे तसेच बनावट औषध कंपन्यांचे रॅकेट रोखण्यासाठी अन्न सुरक्षा मानक कायदयाची कठोर अंमलबजावणी करुन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिकाधिक प्रयोगशाळा निर्माण करुन जनतेमध्ये जनजागृती करण्याकरिता उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(२) सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.**

"महाराष्ट्र राज्यात लाखो शिक्षक सेवक, विशेषतः खाजगी प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना शिक्षण हक्क कायद्याच्या (RTE) अंमलबजावणीच्या नावाखाली टीईटी (TET) परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली असणे, नऊ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा दिल्यानंतरही केवळ टीईटी परीक्षा उत्तीर्ण नसल्याच्या कारणास्तव नोकरी गमाविण्याची भीती निर्माण झाली असून त्यामुळे सदर शिक्षकांवर आणि त्यांच्या कुटुंबावर गंभीर मानसिक व आर्थिक संकट ओढवले असणे, केंद्र शासनाने सन २०१२ पूर्वी नियुक्त केलेल्या शिक्षकांना टीईटी परिक्षेतून सूट दिलेली असताना, राज्य शासनानेही त्याच धर्तीवर सेवाज्येष्ठता विचारात घेऊन लाखो शिक्षकांना दिलासा देण्याची आवश्यकता असणे, वारंवार मुदतवाढ देऊनही अनेक शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत, कारण टीईटी परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम अत्यंत क्लिष्ट असणे, हा प्रश्न केवळ टीईटी परिक्षेपुरता मर्यादित नसून राज्यातील हजारो शिक्षकांच्या रोजगाराशी निगडित असणे, तरीही या गंभीर प्रश्नाकडे शासकीय यंत्रणेने दुर्लक्ष केलेले असणे, तसेच जुन्या पेन्शन योजनेचा लाभ नाकारल्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढलेला असणे, या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने मानवतेच्या दृष्टीकोनातून संबंधित शिक्षकांना सेवा संरक्षण प्रदान करणे अत्यंत आवश्यक असणे, त्यांची सेवाज्येष्ठता व अनुभव विचारात घेऊन टीईटी परिक्षेतून सूट देण्याबाबत सकारात्मक व आवश्यक निर्णय शासनाने तातडीने घ्यावा, अशी मागणी करण्यात येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १० डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद

शासकीय मुद्रणालय, नागपूर